प्रेम फाऊंडेशन, नाशिक
रजि. नं.
एफ-१३५२५/१२
नाशिक

# प्रेम फौन्डेशन, नाशिक

## वार्षिक अहवाल -२०२२-२३

प्रेम फौंडेशन नाशिक द्वारा सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात विविध उपक्रम राबविण्यात आलेत.संस्थेच्या माध्यमातुन समाजाच्या आणि प्रामुख्याने महिलांच्या सामाजी ,आर्थिक व राजकीय सक्षमीकरणासाठी तसेच त्यांच्या क्षमता विकासासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.या अनुषंगाने राबविण्यात आलेल्या उपक्रमांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे-

**१) महिलांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणांचे आयोजन :-** संस्थेच्या कार्यक्षेत्रातील आंबेवाडी, खड्केद,इंदोरे,वासाळी,बारशिंगवे ता.इगतपुरी जि.नाशिक येथील उद्योग-व्यवसाय करू इच्छिणा-या महिलांचे उद्योग जकता विकास विषयक कौशल्य प्रशिक्षण घेण्यात आले.या प्रशिक्षणात उद्योग-व्यवसायाचे प्रकार, उद्योग-व्यवसायाची निवड, व्यवसायासाठी भांडवल उभारणी,बाजार व्यवस्था, कच्च्या मालाची उपलब्धता,कच्चा माल व उत्पादित मालाच्या साठवणुकीची व्यवस्था,विविध परवानग्या,दस्तावेज प्रक्रिया इ.बाबींची सविस्तर माहिती या प्रशिक्षणांच्या माध्यमातून देण्यात आली.






या पाचही गावांमध्ये घेण्यात आलेल्या या प्रशिक्षणामध्ये ३१८ महिलांनी सक्रीय सहभाग घेतला. सदरचे प्रशिक्षणे घेण्यासाठी राजेंद्र कुलकर्णी,राजेंद्र पवार,स्मिता शिंपी,नितीन सोनवणे, डॉ.वाजे इ. व्यक्तींनी प्रशिक्षक म्हणून काम पहिले.

२) **एकात्मिक ग्रामीण महिला उपजिविका सक्षमीकरण प्रकल्प :-** इंडिगो एअरलाईन्स च्या सामाजिक दायित्व निधीच्या मदतीने व अफार्म संस्था पुणे च्या तांत्रिक मार्गदर्शनाने नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील बारशिंगवे, वासाळी, इंदोरे, खडकेंद आंबेवाडी या पाच आदिवासी गावातील ११०० आदिवासी महिलांसोबत सन 2018 पासून हा प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पात उद्योग-व्यवसाय आधारीत 70 उत्पादक गटांची उभारणी व गावनिहाय एक या प्रमाणे पाच ग्रामसंघाची निर्मीती करण्यात झाली आहे.यातील महिला प्राप्त क्षमता बांधणीच्या जोरावर आपल्या शेतात अल्पखर्ची तंत्रज्ञानाचा वापर,पशुविषयक आजारांवरील घरगुती औषधांचा वापर, डिजिटल पेमेंटचा वापर या सोबतच छोटे-मोठे उद्योग-व्यवसाय करू लागल्या आहेत.






यात प्रामुख्याने अ) ५२४ महिला शेतकरी अल्पखर्ची तंत्रज्ञानाचा वापर करू लागल्या असून यामुळे प्रति शेतकरी ८१६९/-रु.ची बचत होऊन जवळपास ४२८०५५६/- रु.ची वार्षिक खर्चात बचत होण्यास मदत झाली.

प्रेम फाऊंडेशन, नाशिक
रजि. नं.
एफ-१३५२५/१२
नाशिक

ब) ६०२ पशुपालक महिलांनी आपल्या २४०८ पशुंच्या आजारावर घरगुती उपचाराने मात केली यामुळे आत्मविश्वास वाढीस लागुन ७२२४००/- रु.च्या औषधोपचाराची बचत झाली.

क)आज रोजी ११०० महिलांपैकी ४०२ महिला४०,२०,०००/- रु.च्या मदतीने २१४ व्यवसाय करून आपल्या कुटुंबाच्या उपजीविकेस हातभार लावीत आहेत.

ड)महिलांच्या क्षमता बांधणीमुळे विविध शासकीय योजनांची माहिती होऊन या वर्षी ६८९ महिलांनी ८९,३५,४५६/-रु.रकमेच्या शासकीय योजनांचा लाभ घेतला आहे.

इ)या महिलांच्या उद्योग-व्यवसायाच्या शाश्वत विकासासाठी "नारी आदिवासी महिला कृषी उत्पादक कंपनी लि.ची नोंदणी करून तिच्या कामकाजास सुरुवात केलेली आहे.

फ)या वर्षी प्रकल्प क्षेत्रात झालेल्या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या निवडणुकीत वासाळी येथील महिला सभासद व प्रकल्पाच्या प्रेरणा सखी सौ.अनिता कोरडे यांनी सरपंच पदासाठी उमेदवारी करीत निवडणुक लढवली.या सरळच्या लढतीत त्यांचा पराभव झाला असला तरी त्यांनी प्रकल्पाच्या माध्यमातून पुढे येत केलेली हिम्मत ही इतर महिलांसाठी मार्गदर्शक ठरते आहे.

**३) एच. आय. व्ही संसर्गित व्यक्तींचा वधु-वर परिचय मेळावा :-** एच. आय. व्ही. बाधित व्यक्तींना योग्य जोडीदार मिळून त्यांना त्याचा सुखी संसार करता यावा म्हणून राज्यातील सर्व जातीय एच. आय. व्ही.सह जीवन जगणाऱ्या व्यक्तीचा वधु-वर परिचय मेळावा दि.१० डिसेंबर २०२२ रोजी नाशिक येथे घेण्यात आला.




या मेळाव्यात २०० हून अधिक वधु-वरांनी सहभाग घेतला तर त्यातील ७ वधु-वरांचा विवाह निश्चीत करण्यात आला. अशा वधु-वर परिचय मेळाव्यामुळे उपवर मुला-मुलींसोबतच जोडीदार गमावलेल्या व्यक्तींनाही एक व्यासपिठ उपलब्ध झाले. परिणामी जगण्याची उमेद वाढीस लागण्यास

प्रेम फाऊंडेशन, नाशिक
रजि. नं.
एफ-१३५२५/१२
नाशिक

मदत झाली.या वधु-वर परिचयमेळाव्यात आरोग्य विभागाचे अधिकारी-कर्मचारी,विविध स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी ,सामाजिक क्षेत्रातील जाणकार व्यक्ती यांनी सक्रीय सहभाग घेतला.





होलीक्रॉस चर्चमध्ये वधू-वर परिचय मेळावा संपन्न

एचआयव्हीसह जीवन जगणारी जोडपी अडकणार विवाह बंधनात!

**४) पर्यावरण संतुलन आणि संरक्षण कार्यक्रम:-** समाज विकासातील प्रमुख घटक असलेल्या पर्यावरण संतुलन व संरक्षण कार्यक्रमात संस्था सक्रीय कार्य करीत आहे.यात रोप लागवड,प्लास्टिक वापरावर बंदी बाबत जनजागृती,जल,जंगल,जमीन संवर्धनाचा प्रचार-प्रसार,करीत आहे.तसेच नदी संवर्धनासाठी नदी वारी जसे गोदावरी नदी वारी,दारणा नदी वारी,इ.च्या माध्यमातून नदी प्रदूषित होणा-या जागेंचा व कारणांचा शोध घेवून त्या बाबत लोकजागृती करीत आहे.या अनुषंगाने ४ नोव्हेंबर २०२२ रोजी गोदावरी किनारी आत्मक्लेश आंदोलन करण्यात आले.तर ५ डिसेंबर २०२२ रोजी दारणा नदीची शिवार फेरी करण्यात आली.यात अनेक पर्यावरण प्रेमींनी सहभाग घेतला.



लक्ष महाराष्ट्र ४

दारणा नदी शिवारफेरीत अनेक निरीक्षणांची नोंद



'गोदावरी संवर्धन समिती'कडून उपनद्यांच्या अभ्यासासाठी शिवार फेरी

प्रेम फाऊंडेशन, नाशिक
रजि. नं.
एफ-१३५२५/१२
नाशिक





**५) प्रेमांगण वृद्धाश्रम :-** समाजातील वृद्ध व्यक्तींच्या वाढत्या समस्या लक्षात घेता त्यांना ना नफा ना तोटा या तत्वावर जर काही व्यक्तींसाठी वृद्धाश्रम सुरु केला तर त्यातुन अनुभव येऊन भविष्यात अल्प खर्चात अधिकाधिक वृद्धांची सेवा करून त्यांच्या समस्या सोडवण्यास मदत करता येईल या उद्देशाने “प्रेमांगण” या नावाने फक्त चालत्या फिरत्या वृद्धांसाठी वृद्धाश्रम-हॉलिडे होम सुरु करण्याचे ठरले.











त्यानुसार नाशिक शहरातील सुंदरबन कॉलनी परिसरात प्रायोगिक तत्वावर भाड्याची इमारत घेऊनया ठिकाणी सर्व सोयीनी युक्त अशा वृद्धाश्रमाची सुरुवात करण्यात आली आहे.भविष्यात जास्तीत-जास्त वृद्धांची कमी खर्चात कशी सोय करता येईल ?याचे संस्था नियोजन करीत आहे.

**६) विधवा महिला सन्मान व संरक्षण अभियान :-** एखाद्या स्री च्या पती निधानंतर समाजातील अनिष्ट रूढी प्रथा,परंपरेनुसार त्या स्री च्या कपाळावरील कुंकू पुसणे,हातातील बांगड्या फोडणे,मंगळसुत्र,जोडवे काढून घेणे,या सारख्या बाबी केल्या जातात.राज्यासह,देश आणि जागतिक स्तरावरही अशा अनिष्ट रूढी,प्रथा,परंपरा पाळल्या जातात.या अनिष्ट प्रथा,परंपरांमुळे महिलेला तिचा आत्मसन्मान गमवावा लागतो.या स्थितीत तिची इच्छा असो वा नसो तिला या अनिष्ट रूढी प्रथा परंपरा यांचे पालन करावेच लागते.एवढ्यावरच हे दृष्ट चक्र थांबत नाही तर पती निधनानंतर त्यात तिचा काहीही दोष नसतांना पुढील आयुष्य विधवा म्हणुन आणि एक अशुभ व्यक्ती म्हणुन अपमानास्पद स्थितीत जगावे लागते.हे योग्य नाही.म्हणुन अशा प्रकारच्या अनिष्ट रूढी,प्रथा,परंपरा कायमस्वरूपी बंद व्हाव्यात.व त्या साठी कायदा करावा म्हणुन विधवा महिला सन्मान व संरक्षण अभियान सुरु करण्यात आले आहे.






या अभियानाची व्याप्ती राज्यभर झाली असून शासन स्तरावर पाठपुराव्या अंती ग्रामपंचायतीनी अशा अनिष्ट रूढी,प्रथा,परंपरा यावर ग्रामसभेत कारचा करून त्या बंद करण्याचे

ठराव करण्याबाबत शासनाच्या ग्रामविकास विभागाने १७ मे २०२२ रोजी तर महिला व बाल विकास विभागाने दि.२१ मे २०२२ रोजी परिपत्रक काढून या अभियानाच्या कामाला बळ दिले.या अभियानाची व्याप्ती वाढण्याच्या दृष्टीने नाशिक,संभाजीनगर,अहमदनगर,पुणे इ.ठिकाणी राज्य स्तरीय कार्यशाळांचे आयोजन,पुणे येथे सरपंच परिषद,नाशिक येथे संपर्क कार्यालय,विधवा महिलांचा पुनर्विवाह,विधवा महिलांचे पुनर्वसनाच्या दृष्टीने सर्वेक्षण,विविध शासकीय योजनांच्या लाभासाठी मार्गदर्शन केंद्र इ.बाबीचा अवलंब करण्यात आला आहे.या पुढे हे अभियान देश पातळीवर नेवुन केंद्रीय कायदा व व्यवस्था कशी निर्माण करता येईल या साठी संस्था प्रयत्नशील आहे,


नाशिक, सोमवार दि. २७ जून २०२२

विधवा महिला सन्मान व संरक्षण कायदा व्हावा : राजू शिरसाठ


पुढारी

विधवांना समाजात सन्मानाने जगू द्या

नाशिक येथे आयोजित कार्यशाळेतील सूर


नाशिक : बैठकीस उपस्थित राजू शिरसाठ, मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, शोभा काळे, प्रमोद जाधव, गणेश कडलग, किशोर काळे आदी.

विधवा दिनानिमित्त विविध उपक्रम


विधवा सन्मान कायद्यासाठी लढा सुरू ठेवण्याचा निर्धार

महिलांचे आंदोलन

लोकसत्ता प्रतिनिधी

या व अशा प्रकारच्या विविध उपक्रमाचे आयोजन 'या आर्थिक वर्षात करण्यात आले. या कार्याच्या यशस्वीतेसाठी इंडिगो एअर लाईन्स दिल्ली, अफार्म संस्था पुणे,एन. जी. ओ. फोरम नाशिक, गोदावरी कन्सल्टन्सी नाशिक. या सोबतच विविध सहाय्यकारी संस्था, शासनाचे विविध विभाग, देणगीदार व हितचिंतकांसोबतच संस्थेचा कर्मचारी वर्ग आणि लाभार्थी घटक यांचे मोलाचे सहकार्य लाभले. असेच सहकार्य भविष्यातही लाभो.संस्था या सर्वांची सदैव ऋणी आहे.

प्रेम फाऊंडेशन, नाशिक — रजि. नं. एफ-१३५२५/१२ नाशिक

अध्यक्ष
प्रेम फाऊंडेशन
नाशिक